MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५५/२०१५-१६/२२ दिनांक: २५-०४-२०१६

## आदेश
## आदेश केस क्र. ५५/२०१५-२०१६

श्री. राजाराम महादेव कडाकणे — अर्जदार
मु.पो. बहिरेवाडी ता. आजरा
जिल्हा कोल्हापूर

विरूध्द

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर

२) कार्यकारी अभियंता, — विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, गडहिंग्लज

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग, आजरा.

**कोरमः-** १. श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

मी श्री. पी.व्ही खपली सदस्य सचिव ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

दिनांक २९.१.२०१६ रोजी श्री. राजाराम महादेव कडाकणे ग्रा. क्र. २५५०३०००२६०० यांनी आपण २०१२ साली वीज जोडणी मिळावी रु.५६५/- भरल्याचे नमूद करुन अ फॉर्म तक्रार दाखल केली होती, अंतर्गत कक्ष कोल्हापूर यांनी त्यांच्या क्ष मधील तक्रारारीचा निकाल देऊन नविन कंत्राटदार निश्चित झाल्यानंतर उपकार्यकारी अभियंता आजरा यांनी पाठ पुरावा करुन तक्रारदाराचे कनेकशन देणेसाठी कार्यवाही करावी असा निकाल १७ ऑक्टो. २०१५ रोजी दिला होता.

सदर तक्रारीवर मंचाकडून मुददे निहाल अहवाल मागविला होता, त्यामध्ये उपकार्यकारी अभियंता यांनी आपल्या उत्तरात टेस्ट रिपोर्ट दिल्यानंतर अर्जदार याना वीज कनेकशन देण्यांत येईल असे म्हटले आहे, दि. २१.३.२०१६ रोजी श्री. कडाकणे यांनी मला वीज कनेकशन लवकरच मिळणार आहे. सबब माझा तक्रार अर्ज रदद् करावा अशी लेखी विनंती मंचाकडे केली आज दि. ५.४.२०१६ रोजी प्रत्यक्ष सुनावणी पूर्वी श्री. कडाकणे यांनी मला विदयुत कनेकशन मिळाले आहे अशी माहिती फोन वरुन दिली. सुनावणी दरम्यान उपकार्यकारी अभियंता श्री. लोंढे यांनी दि. २१.३.२०१६ रोजी वीज जोडणी दिल्याचे सांगितले.

वरील सर्व मुदद् विचारात घेता ग्राहकाचे गा-हाणे दूर झाले आहे याची मंचास खात्री पटली आहे. सबब श्री. राजाराम महादेव कडाकणे यांची तक्रार निकाली काढणेत येत आहे. उपकार्यकारी अभियंता उपविभाग आजरा यांनी लेखी पत्र देवून ग्राहकाची तक्रार दूर झाल्याचे मंचास कळवावे.

## **<u>आदेश</u>**

१. ग्राहकाचा अर्ज निकाली काढणेत येत आहे.
२. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
३. निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-
(पी.व्ही. खपली)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

सही/-
श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.